# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – 411 018

## करआकारणी व करसंकलन विभाग.

## *मिळकतकर अभय योजना.*

मिळकतधारकांनी थकबाकीसह पहिल्या सहामाही अखेर मिळकतकराची रक्कम 30 सप्टेंबर 2017 अखेर व दुस-या सहामाहीची रक्कम 31 डिसेंबर 2017 अखेर भरणे आवश्यक आहे. सदर मुदतीत मिळकतधारक / भोगवटादार यांनी मिळकतकराचा भरणा केला नाहीतर थकीत पहिल्या सहामाही अखेरच्या रक्कमेमधील मनपा करावर दरमहा 2% व शासन करावर वार्षिक 10% शास्ती / व्याज रक्कमेची आकारणी दिनांक 01 ऑक्टोबर 2017 पासून आकारण्यात येत आहे. मिळकतकराचा थकबाकीसह संपूर्ण भरणा करणा-या मिळकतधारकांकरिता **महापालिकेतर्फे अभय योजना** राबविण्यात येत आहे.

### मिळकतकर अभय योजनेबाबत सूचना -

- **दिनांक 01 ऑक्टोबर ते 31 ऑक्टोबर** या कालावधीमध्ये संपूर्ण मिळकतकराची रक्कम एक रक्कमी भरल्यास **'म.न.पा. कर शास्ती (दंड) रक्कमेत 75 %** सूट दिली जाईल.
- **दिनांक 01 नोव्हेंबर ते 30 नोव्हेंबर** या कालावधीमध्ये संपूर्ण मिळकतकराची रक्कम एक रक्कमी भरल्यास **'म.न.पा. कर शास्ती (दंड) रक्कमेत 50 %** सूट दिली जाईल.
- **'अवैध बांधकाम शास्ती'** धारक मिळकतधारकांनी अवैध बांधकाम शास्तीसह रक्कम एक रक्कमी भरणे आवश्यक आहे. तथापि, फक्त मनपा शास्ती (दंड) रक्कमेतच सुटीची योजना लागू असेल.
- **'अवैध बांधकाम शास्ती'** रक्कमेवर सूट लागू नाही.
- बिलाचे एकूण रक्कमेवर सूट लागू नाही. बिलातील फक्त **'मनपा कर शास्ती' (दंड) रक्कमेवरच** अभय योजना लागू आहे.
- या शिवाय महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर मिळकतकर भरणेकामी ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. मिळकतकराचा ऑनलाईन भरणा करणा-या मिळकतधारकांना सर्वसाधारण (चालू वर्षाचे मागणीतील सामान्य करात) करात 2% सवलत लागू राहील.

"अभय योजनेचा लाभ घ्या 'मनपा कर शास्ती (दंड) रक्कमेत सूट मिळावा.

मिळकतकर त्वरित भरा व जप्ती टाळा. "

(नितीन काळजे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – 411 018

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – 411 018

जाहिरात क्रमांक : 840.

जावक क्रमांक : कर/मुख्य/3/कावि/575/2017

दिनांक :16 /10/2017